N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): बुलढाणा **P.S.**(ठाणे): शेगांव

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0257 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/05/2025 04:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार
   **Time Period** (कालावधी): पहर 6
   **Date From** (दिनांक पासून): 07/05/2025
   **Date To** ( दिनांक पर्यंत): 07/05/2025
   **Time From** (वेळेपासून): 18:24 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 18:37 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 08/05/2025 **Time** (वेळ): 04:00 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 005

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 08/05/2025 04:07 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

दक्षिण, 2 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तक्रारदार यांचे राहते घर,चंद्रलोक सोसायटी, मुररका कालेज रोड, शेगाव ,शेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.दिनकरराव नारायणराव रायपुरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1941

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | चंद्रलोक सोसायटी, ,मुरारका कालेज रोड, शेगाव,शेगांव ,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | चंद्रलोक सोसायटी, ,मुरारका कालेज रोड, शेगाव,शेगांव ,बुलढाणा,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7498624831

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत महादेव बानोले | | | 1. गांधी चौक शेगाव,,शेगांव , बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

शेगाव

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद शासकिय विश्रामगृह शेगाव दिनांक 08.05.2025 श्री.दिनकरराव नारायणराव रायपुरे, वय 84 वर्षे, व्यवसाय सेवानिवृत्त अपर जिल्हाधिकारी, रा.चंद्रलोक सोसायटी, गुरारका का ॅलेज रोड, शेगाव ता.शेगाव जि. बुलढाणा मो.नं.7498624831 समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहतो व मी अपर जिल्हाधिकारी म्हणुन सन 2000 मध्ये सेवानिवृत्त झालेलो आहे. दिनांक 05.05.2025 रोजी मी अ ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांचेकडे फोनव्दारे माहिती दिली की, माझी पत्नी सौ. विमल दिनकरराव रायपुरे हिचे नावे मौजे खापरखेड ता.मलकापुर येथे 1 हेक्टर 23 आर जमीन असुन सदर शेती मला व्यावसायीक अकृषक(NA) करणे असल्याने मी सर्व आवश्यक कागदपत्रांसह शेगाव येथील खाजगी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांना भेटलो असता त्यांनी मी सादर केलेल्या कागदपत्रानुसार माझे पत्नीचे नावे असलेल्या शेतीचे व्यावसायीक अकृषक (NA) संबधाने फाईल तयार करुन आ ॅनलाईन प्रकरण नगर रचना विभाग बुलढाणा कार्यालय यांचे पोर्टलवर अपलोड केले होते. या करीता मी, खाजगी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांना त्यांचे कामाचा मोबदला म्हणुन 20,000/- रुपये दिले. दिनांक 25.04.2025 रोजी मी माझे पत्नीच्या नावे असलेल्या शेतीचे व्यावसायीक अकृषक(NA) संबधीचे प्रकरणाबाबत खाजगी इंजिनिअर श्री. प्रशांत बानोले यांचे फोनवर बोलणी केली असता त्यांनी, तुमचे काम पुर्ण करण्यासाठी नगर रचना विभाग बुलढाणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना 1,00,000/- रुपये दयावे लागतील, तुम्ही पैसे दिले तर तुमचे काम होवुन जाईल. असे सांगुन 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत फोनवर माहिती दिली होती. त्यावरुन दिनांक 05.05.2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. रमेश पवार, अ ॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पंचायत समीती बुलढाणा कार्यालयाचे दोन शासकिय कर्मचारी पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून सदर पंच व कारवाई पथक असे त्यांचे शासकिय वाहनाने खामगाव ते शेगाव रोडवरील माऊली वाटर पार्कजवळ भेट घेतली. सदर ठिकाणी पोनि श्री. पवार यांनी माझा तसेच पंचाचा आपसात परिचय करुन देवून माझी रितसर वरिलप्रमाणे लेखी तक्रार नोंदवुन घेतली. त्यानंतर पोनि श्री.पवार यांनी पडताळणी कार्यवाहीबाबत सुचना देवून व्हा ॅईस रेका ॅर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीनुसार यातील खाजगी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करणे असल्याने त्यांची भेट घेण्याचे ठरविण्यात आले. त्यावरुन मी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांना फोन करुन विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी अकोला येथे आलो आहे, शेगाव येथे आल्यानंतर मी आपणास आपल्या घरीच भेटतो. असे सांगीतल्याने इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही माझे घरीच करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पोनि श्री.पवार, दोन्ही पंच तसेच कारवाई पथकातील सदस्य असे शासकीय वाहनाने तसेच मी व माझा मुलगा संदीप असे आमचे वाहनाने घरी आलो. आमचे घरात कारवाई पथक व पंच असे थांबुन असतांना रात्री सुमारे 08.48 वा सुमारास इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांनी मला फोन करुन सांगीतले की, दहा मिनीटांत आपल्या घरी येतो. तेव्हा पोनि श्री.पवार यांचे सुचनेप्रमाणे कारवाई पथकातील पोहेका ॅ क्षिरसागर यांचे हस्ते व्हा ॅईस रेका ॅर्डर सुरु करुन माझे शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अशाप्रकारे लटकावून दिले व पंच क्र. 1 श्री. अंभोरे यांचेसह माझे घरात हा ॅलमध्ये इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांची रात्री 09.00 वा भेट घेतली. सदर भेटी दरम्यान इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांनी माझे पत्नीचे नावे असलेली शेतजमीनीचे व्यावसायीक अकृषक (NA) प्रकरण नगर रचना विभाग बुलढाणा येथील अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन मंजुर करुन आणुन देण्यासाठी तडजोडअंती 75,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्यास संमती दर्शविल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान संभाषणामध्ये गाठे मॅडम, गरुवाल, ढोरे यांची नावे घेतली असल्याने दिनांक 06.05.2025 रोजी नगर रचना विभाग बुलढाणा येथील संबधीत अधिकारी/कर्मचारी यांची भेट घेवुन त्यांची लाचेसंबधी पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार दिनांक 06.05.2025 रोजी मी ला.प्र.वि.बुलढाणा कार्यालयात

हजर आलो. तेव्हा पोनि श्री.पवार यांनी मला व पंचांना पडताळणी कार्यवाही संबधाने पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनांची उजळणी करुन दिली. तसेच नगर रचना विभाग बुलढाणा येथील संबधीत गाठे मॅडम, गरुचाळ व ढोरे साहेब हे माझ्याकडे लाचेची मागणी करतात काय? याबाबत पडताळणी करण्याकरीता पोनि श्री.पवार यांचे सुचनेप्रमाणे व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन गळयात शर्टाचे आतील बाजुस बाहेरुन दिसणार नाही अशा स्थितीत लटकवुन देवुन पंच क्र.1 यांचेसह माझे खाजगी वाहनाने नगर रचना विभाग बुलढाणा कार्यालयात गेलो असता तेथील एक महीला कर्मचायास गाठे मॅडम यांचे बाबत विचारणा केली असता गाठे मॅडम जेवन करण्यासाठी गेलेल्या असल्याचे सांगीतले. त्यावरुन मी गाठे मॅडम यांना फोन करुन बोलणी करुन माझ्या प्रकरणाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, तुमचं प्रकरण सकाळीच अप्रुव्ह करुन एसडीओ यांचेकडे पाठविले आहे. त्यावरुन मी त्यांना तुम्हाला भेटण्याची गरज नाही का मग आता?, असे विचारले असता गाठे मॅडम यांनी तुम्हाला कोणालाही भेटण्याची गरज नाही असे सांगीतले असता मी कोणालाही न भेटता अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा कार्यालयात परत आलो. दिनांक 05.05.2025 रोजी आयोजीत पडताळणी दरम्यान खाजगी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले कोणत्या अधिका-यासाठी लाच मागीतली याबाबतची खात्री करण्यासाठी दि.07.05.2025 रोजी पडताळणी व सापळा संयुक्तीक कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार मी आज दिनांक 07.05.2025 रोजी पोनि श्री.पवार यांचे सुचनेप्रमाणे शासकीय विश्रामगृह शेगाव येथे 12.30 वा सुमारास हजर आलो. शासकीय विश्रामगृह शेगाव येथील एका खोलीमध्ये पोनि श्री.पवार यांनी मला, इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांना लाच मागणी प्रमाणे देण्यासाठी 75,000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील 500/- रुपये दराच्या भारतीय चलनातील 150 नोटा असे एकूण 75,000/-रुपये पोनि श्री.पवार यांचेकडे हजर केले. त्यावेळी पोनि श्री. पवार यांनी सापळा पथकातील सदस्यांचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक नोंद करुन घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण केली. त्यानंतर सदर लाच रक्कम माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिष्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री.पवार यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी इंजिनिअर श्री.प्रशांत बानोले यांना माझे फोनवरुन फोन करुन लाच रक्कम घेवुन कुठे भेटायचे विचारले असता ते कामात व्यस्त असल्याने फोन करुन कळवितो असे सांगीतले. त्यामुळे आम्ही शासकीय विश्रामगृह शेगाव येथे थांबुन राहीलो. सायंकाळी 06.00 वा सुमारास इंजिनिअर श्री.बानोले यांचा माझे मोबाईलवर फोन आला तेव्हा त्यांनी सांगीतले की, मी तुमच्या घराचे समोर असलेल्या चौकामध्ये आलो असल्याचे सांगीतले. तेव्हा मी त्यांना तुमच्या कार्यालयावर येतो असे म्हटले असता त्यांनी सांगीतले की, मी माझ्या कार्यालयात येणार नाही, आपण तुमच्याच घरी भेटु असे सांगीतल्यावरुन सापळा कार्यवाही हि माझे घरीच आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याबाबतचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर पोनि श्री. पवार सोबत दोन्ही पंच, कार्यवाही पथकातील सदस्य तसेच मी असे शासकीय वाहनाने माझे घराकडे 18.15 वा रवाना झालो. माझे घराचे अलीकडे शासकीय वाहन थांबवुन पोनि श्री.पवार यांनी पोहेकाॅ क्षिरसागर यांचे हस्ते माझेजवळ व्हाॅईस रेकाॅर्डर सुरु करुन माझे गळयात शर्टाचे आतुन बाहेरुन दिसणार नाही अशा स्थीतीत लटकवुन मला व पंच क्र. 1 श्री.अंभोरे यांना 18.24 वा माझे घराकडे रवाना केले. तसेच पोनि श्री.पवार सोबत पंच क्र.2 व सापळा पथकातील सदस्य असे शासकीय वाहनातुन उतरुन पायी चालत आमचे मागो-माग माझे घराकडे आले. त्यावेळी घराबाहेर प्रशांत बानोले हे उभे होते. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्री. अंभोरे आणि प्रशांत बानोले असे घरात गेलो घरामधील हाॅलमध्ये बसुन आमचेमध्ये कामासंबंधाने चर्चा झाली. त्यादरम्यान कामाबाबत विचारणा करण्यासाठी श्री.बानोले यांनी नगर रचना विभागाचे सुमीत ढोरे यांना फोन करुन आज नाही तर उदया काम कम्फर्म होवुन जाईल अशी खात्री करुन घेतली व सदरचे प्रकरण हे ढोरे साहेब यांच्याकडेच असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशातील लाच रक्कम 75,000/-रुपये काढून इंजिनिअर श्री. प्रशांत बानोले यांचे समोर धरुन मोजुन घ्या असे म्हटले तेव्हा त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन हातात ठेवली. त्यानंतर मी घराचे मुख्य दरवाजामध्ये येवुन सापळा पथकास दिसेल अशा पध्दतीने डोक्यावरुन डावा हात फिरवुन लाच स्विकारल्याचा नियोजीत

शारा केला असता, पोलीस निरीक्षक श्री. पवार साहेब, व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी खाजगी इंजिनिअर श्री. प्रशांत बानोले यांना ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.प्रशांत महादेव बानोले, वय 53 वर्श, व्यवसाय सिव्हील इंजिनिअर, रा.गांधी चौक शेगाव ता.शेगाव जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यावेळी कारवाई पथकाने श्री.प्रशांत बानोले यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारल्यामुळे ताब्यात घेवून शासकिय विश्राम गृह शेगाव येथे आणले. सापळा पंचनाम्याचे कारवाई दरम्यान श्री.प्रशांत बानोले यांचे मोबाईलवर Sumit Dhore ATo Buldhana या नावाने काॅल येत होता. त्यामुळे याबाबत श्री.बानोले यांना विचारणा केली असता, त्यांनी सांगीतले की, हेच सुमित ढोरे नगर रचना विभाग बुलढाणा येथील साहेब आहेत.

त्यानंतर केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. दिनांक 05.05.2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान माझी पत्नी सौ.विमल दिनकरराव रायपुरे हिचे नावे मौजे खापरखेड ता.मलकापुर येथे 1 हेक्टर 23 आर जमीन असुन सदर शेती चे व्यावसायीक अकृषक(NA) प्रकरण नगर रचना विभाग बुलढाणा कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी मार्फत मंजुर करुन देण्यासाठी आरोपी श्री.प्रशांत बानोले यांनी तडजोडीअंती 75,000/- रुपये लाच मागणी करुन स्विकारण्यास संमती देवुन आज दिनांक 07.05.2025 रोजी आयोजीत सापळा कार्यवाहीमध्ये 18.24 वा. ते 18.37 वा. दरम्यान माझे शेगाव येथील राहते घरात श्री. प्रशांत महादेव बानोले, वय 53 वर्श, व्यवसाय सिव्हील इंजिनिअर, रा.गांधी चैक शेगाव, ता.शेगाव जि.बुलढाणा यांनी फोनव्दारे सुमित ढोरे यांचेशी कामाबाबत बोलणी करुन 75,000/- रुपये लाच रक्कम स्विकारली. तरी आरोपी श्री. प्रशांत महादेव बानोले यांनी नगर रचना विभाग बुलढाणा येथील श्री.सुमीत ढोरे यांचेमार्फत प्रकरण मंजुर करुन देण्यासंबधाने माझेवर त्यांचे ओळखीचा प्रभाव टाकुन लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचेविरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. मी दिलेली फिर्याद संगणकावर पोहेकाॅ.राजेंद्र क्षिरसागर यांनी टंकलिखित केली संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेल्या फिर्यादची प्रिंट काढून ती मी वाचून पाहीली माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. समक्ष, सही, (श्री. रमेश पवार) पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्षन ब्युरो, बुलढाणा
अशा फिर्याद वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपास (श्री. रमेश पवार) पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्षन ब्युरो, बुलढाणा याचे कडे देण्यात आली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

NITINKUMAR VINAYAK PATIL(I (Inspector)) / 1234 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन, शेगांव
जि.बुलढाणा

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** NITINKUMAR VINAYA

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 1234

HC 813
ठाणे अंमलदार
[HC इस्तीयाक शेख
ब.नं. 813
पो.स्टे. शेगाव शहर]